# नागपुर नागरिक सहकारी बैंक लि.

## (मल्टीस्टेट शेडूल्ड बैंक)

**मुख्य कार्यालय ७९,डॉ. आंबेडकर चौक सी ए. रोड, नागपुर ४४०००८ दूरध्वनी क्र. ०७१२ -२७६३३०१,२७६४३१३**

# ताबा व विक्री सूचना स्थावर संपत्ती करीता

खाली सही करणा-यांनी सिक्युरीटायझेशन एन्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेस्ट्स एन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट - २००२ आणि सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स २००२ च्या नियम ३ सह कलम १३(१२) सह वाचता अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून नागपूर नागरिक सहकारी बैंक लि. चे अधिकृत अधिकारी या नात्याने वरील कायद्याचा कलम १३(२)अंतर्गत बँकेचे श्री.विनोद गुलाबराव वानखेडे प्रोप्रा. में श्री गजानन राइस मिल जमानतदार व गहानदार तसेच कायदेशीर वारस यांना रु २,५८,७२,१३९=०० (दोन कोटी अठ्ठावन्न लाख बहात्तर हजार एकशे एकोणचाळीस रु मात्र) ६० दिवसाच्या आत परतफेड करण्याविषयीचे मागणीपत्र/ सुचना दिनांक ०४.१०.२०१८ रोजी देण्यात आली.

कर्जदार जमानतदार, गहाणकर्ता हे त्यांच्या दिलेल्या रकमेची परतफेड करण्यास अपयशी ठरल्याने कर्जदार,जमानतदार, गहाणकर्ता, यांना विशेष करुन व सर्व सामान्य जनतेला या सुचनेदवारे सुचना देण्यात येत आहे की खालील सही करणा-याने, मा. जिल्हा दंडाधिकारी यांनी कायद्याच्या कलम १४ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून प्रकरण क्र. २५०/२०१९ दिनांक २८/१२/२०२३ मध्ये पारीत आदेशानुसार खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा दिनांक **१३/०३/२०२४** रोजी घेतला आहे.

कर्जदार जमानतदार व गहानदार यांना विशेषतः व सर्व सामान्य जनतेला या सुचनेद्वारे ताकीद देण्यात येत आहे की, त्यांनी खालील नमुद केलेल्या मालमत्ते संबंधीत कोणताही व्यवहार करू नये, आणी या मालमत्ते/संपत्ती संबंधित कोणतेही व्यवहार हे नागपुर नागरीक सहकारी बैंक यांचे खाली नमुद केलेल्या कर्ज बाकी रक्कम व त्यावरील व्याजास्तव प्रभाराधीन राहील. वर उल्लेख केलेल्या कायद्याचा कलम १३ मधील तरतुदीनुसार तसेच सिक्यूरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स-२००२ मधील नियम ८ व ९ मधील तरतुदी सह वाचता प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून अधिकृत अधिका-याचा अधिकार क्षेत्रात खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेची विक्री करू इच्छितो व या मालमत्ता विक्री करण्यासाठी उपलब्ध करण्यात येत असून त्यास्तव जनतेकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

तसेच सिक्यूरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स-२००२ अंतर्गत नियम ८(६)अनुसार या सुचनेदवारे कर्जदार, यांना सुचना देण्यात येत आहे की नागपूर नागरिक सहकारी बैंक लि. नागपूर यांचे अधिकृत अधिकारी आता वर नमूद केलेल्या नियमांच्या नियम ८(५) मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही पद्धतीचा अवलंब करून खाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री करता कार्यवाही करतील. या आधी दि. ०३.१२.२०१९ रोजी मालमत्तेची सार्वजनीक विक्री सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती, परंतू कोणतीही निविदा प्राप्त झाली नाही.

**कर्जदार ,गहाणकर्ता/ जामीनदार यांचे नाव, पत्ता व मालमत्तेचा तपशील ;-**

**१)** श्री.विनोद गुलाबराव वानखेडे प्रोप्रा. में श्री गजानन राइस मिल पत्ता- १५० गायत्री कॉलोनी, नेताजी नगर, नागपूरे शाळेच्या मागे भरतवाडा रोड, नागपूर, ४४००३५ जमानतदार १)श्री अनील गुलाबराव वानखेडे २) श्रीमती लीलाबाई गुलाबराव वानखेडे पत्ता:१ ते २ - १५० गायत्री कॉलोनी, नेताजी नगर ,नागपूरे शाळेच्या मागे भरतवाडा रोड, नागपूर, ४४००३५

**गहाण मालमत्ता क्र. १)तपशील:** मौजा-राजोली ग्रामपंचायत- राजोली, तहसिल-मौदा, जिल्हा-नागपूर येथील पटवारी हलका क्र. ६१, खसरा क्र.११२/२/, येथील अकृषक जमीन ज्याचे भुमापन क्षेत्र ०.४१ गुंठे (४१०० चौ.मी. )आहे. यावर बांधण्यात आलेल्या कारखाना व गोदाम ईमारती सहीत ही मालमत्ता श्री.विनोद गुलाबराव वानखेडे, श्री अनील गुलाबराव वानखेडे, व श्रीमती लीलाबाई गुलाबराव वानखेडे यांचे नावाने. संपत्तीची चतुर्सिमा पुढील प्रमाणे: पूर्व दिशा-खसरा क्र १, पश्चिमदिशा- खसरा क्र ११३ , उत्तरदिशा -खसरा क्र ११२ चा उर्वरित भाग दक्षिण दिशा- रोड

**आरक्षित किंमत - रुपये १,५०,००,०००/- ( एक कोटी पन्नास लाख रुपये)**

**गहाण मालमत्ता क्र. २)तपशील: बँकेजवळ नजर गहाण बोजा असलेले संयंत्र आणी उपकरण यांचे विवरण :**

१)SATAKE Grain Multicolour TRICROMATIC true colour sorter- 1 2)Elevator 30 ft. with Geared mortor 5 TPH -9 (3)a)Industrial AC -2 (b) CV CF -1 (4) Fabrication Hopper Structure ETC. Inlet Outlet pipe air aspirtation pipe (5)a) ASD 40 Compressor with all Machine controller air and Moisture -2 (b)TD 51 -2 (c) F 46 KE Filter -2 (d) 1 M3 Air Tank -2 , Destoner, Chalna with motor, Pneumatic rubber sheller with hopper tank and electric motor slide gate cylcone, Water pump and accessories,Whitener with electric motor, Second polisher with motor, (Milltech make) Silky polisher with electric motor (Milltech make), Grader with electric motor (Miltech make) Air compressor. Ingersoll rand make . वरील सर्व यंत्र सामग्रीच्या व्यतिरीक्त कारखान्याच्या जागेवर आढळलेली व लावण्यात आलेली इतर सर्व यंत्र सामग्री तसेच विदयुतीकरण व विद्युत कंट्रोल पॅनेल.

**आरक्षित किंमत - रुपये ७०,००,०००/- (सत्तर लाख रुपये)**

**गहाण मालमत्ता क्र. ३)तपशील:** नागपुर महानगर पालिका आणि नागपुर सुधार प्रन्यास, नागपुर यांचे हद्दीतील वार्ड क्र २१ , मौजा पारडी , खसरा क्र २९,३०,/१-२-३-४ मनपा घर क्र ६०६/१/१५० ,शीट क्र ७७६/८,सिटी सर्वे क्र २७ पटवारी हलका क्र ३४ स्थित मधु वात्सल्य को ऑप हाउसिंग सोसा. लि. ले आउट मधील प्लाट क्र १५० ज्याचे भुमापन क्षेत्र १८०० चौ फु (१६७.२२ चौ मी.व त्यावरील बांधलेले घर) असून ही मालमत्ता श्री.विनोद गुलाबराव वानखेडे यांचे नावाने. सम्पत्तीची चतुर्सिमा पुढील प्रमाणे: पूर्वदिशा-प्लाट क्र १६५, पश्चिमदिशा-२५ मीटर रोड, उत्तरदिशा-प्लाट क्र१४९, दक्षिणदिशा-प्लाट क्र १५१.

**आरक्षित किंमत - रुपये ७०,००,०००/- (सत्तर लाख रुपये)**

**मागणीपत्र सुचना दि. ०४/१०/२०१८ ताबा सूचना दि. २१/१२/२०१८ प्रत्यक्ष ताबा घर :०१/०३/२०२४ प्रत्यक्ष ताबा कारखाना : १३/०३/२०२४ एकूण बाकी रु. १,९५,२८,३१९=०० + व्याज येणे बाकी ०१/१०/२०१८ पासून सेक्युअर्ड कॅश क्रेडिट लिमिट @१६% आणि टर्मलोन प्लांट अँड मशीनरी खाते १५ % टक्के + खर्च**

**विक्रीच्या अटी आणि शर्ती :**

**१)** इच्छुक व्यक्तीनी वर नमुद केलेली मालमत्ता **"जे आहे, जसे आहे,जिथे आहे"** या तत्वावर खरेदीसाठी आपली विनाशर्त निविदा ही मालमत्तेच्या तपशीलासहीत त्यांनी देवू केलेल्या रकमेच्या १०% इतकी रक्कम अर्नेस्ट मनी डीपाँझीट म्हणून नागपूर नागरिक सहकारी बँके लि.,च्या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेवरील ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर सहीत अधिकृत अधिकारी, श्री एम. एल.डोबा यांचे नावाने बंद लिफाफया मधे बँकेच्या कार्यालयीन वेळेत कोणत्याही कामाच्या दिवशी **दि.३०.०३.२०२४** पर्यन्त दुपारी ४.०० वा.पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात सादर करावे.

**२)** मालमत्ता क्र १ व २ मध्ये इच्छुक व्यक्ती फक्त यंत्रसामुग्री करीता अथवा दोन्ही यंत्रसामुग्री व भूखंड तसेच कारखाना इमारतीकरीता निवीदा सादर करू शकतील. फ़क्त भूखंड व कारखाना इमारतीकरीता निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

२) मालमत्ता ही संबंधीत मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या खाली विकली जाणार नाही.

३) निविदा सादर करणा-याना निविदा उघडल्यानंतर त्यांनी देवू केलेली रक्कम वाढविण्यास्तव संधी देण्यात येईल.

४) संबंधित मालमत्तेबाबत काही भाडे, टॅक्सेस किंवा अश्या प्रकारचा अन्य बोजा असल्यास बैंक त्यास जबाबदार राहणार नाही. अशी सर्व रक्कम ही यशस्वी निविदा धारकासच द्यावी लागेल.

५) यशस्वी निविदा धारकास अंतिम निविदा रकमेच्या २५% इतकी रक्कम त्वरित रोख/ ड्राफ्ट/ पे-ऑर्डर द्वारे जमा करावी लागेल व उर्वरित रक्कम ही अंतिम निविदा स्वीकारलेल्या तारखेच्या १५ दिवसाच्या आत द्यावी लागेल. या प्रमाणे ठरविलेल्या कालावधीत संबंधीत मालमत्तेची रक्कम अदा न केल्यास डिपाँझीटची रक्कम जप्त करण्यात येईल. अशा संबंधीत मालमत्तेची परत विक्री करण्यात येउन थकित झालेल्या निविदा धारकाचा कोणताही पूर्ण किंवा अंशत: हक्क संबंधीत मालमत्ते बाबतीत राहणार नाही. व अशी संबंधीत मालमत्ता पुढे विकल्या नंतर विक्री रकमेच्या कोणत्याही हिस्यावर पूर्ण अथवा अंशत: हक्क राहणार नाही.

६) खरेदीदारास संबंधीत विक्रिपत्र/ दाखला स्वत:चे नावे रजिस्ट्रेशन करुन घेण्यासाठी स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन चार्ज व इतर सर्व अज्ञात खर्च स्वत:च वहन करावे लागतील.

७) कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न दाखविता अमान्य करण्याचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मालमत्ता विक्री बँकेच्या मुख्य कार्यालयात **दि.३०.०३.२०२४** रोजी दूपारी ४=०० वाजता करण्यात येईल. निविदा उघडण्याच्या वेळी कर्जदार /गहाणकर्ता हजर राहु शकतात. काही कारणानी मालमत्तेची लिलाव प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही अथवा ती बँकेने रद्द केल्यास अधिकृत अधिकारी हे लिलावाची नोटिस मुख्य कार्यालयातील नोटीस बोर्डावर लावून पुढे लिलाव करू शकतील आणी यासाठी परत सार्वजनिक प्रसिद्धी करण्यात येणार नाही.

८) विक्रीचा तपशील बँकेची वेबसाइट www.nnsbank.co.in वर देखील उपलब्ध आहे.

**९) इच्छुक व्यक्ती मालमत्तेची पहाणी करण्याकरीता विनंती अर्ज सादर करू शकतील जे सुविधेनुसार उपलब्ध करुन देता येईल.**

**सिक्युरीटायझेशन कायदया अंतर्गत कायदेशीर विक्री सुचना :** संबंधीत कर्जदार जमानतदार व गहानदार तसेच कायदेशीर वारस यांना नोटीस देण्यात येत आहे की त्यांनी संबंधीत मालमत्तेचा लिलाव होण्यापूर्वी आपली थकीत कर्ज रक्कम बँकेस अदा करावी, अन्यथा गहाण मालमत्तेचा लिलाव बँकेच्या अटी/ शर्ती नुसार करण्यात येईल. व त्या नंतरही काही कर्जबाकी शिल्लक राहिल्यास संबंधीताकडून वसुल करण्यात येईल.

मालमत्तेच्या आरक्षित किंमतीबाबत कोणताही उजर ऐकला जाणार नाही. संबंधीत कर्जदार व जामीनंदारानी ही नोटिस कायदेशीर विक्रीची सुचना समजावी.

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १५/०३/२०२४**

**एम एल डोबा (अधिकृत अधिकारी)**
**नागपूर नागरिक सह बँक लि.८३७८९७९१८६**